
ISSN 2320 - 4494

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Refereed Research Journal

VOLUME : I ISSUE V Oct.-Dec. 2013



ARTS | COMMERCE | SCIENCE | AGRICULTURE | EDUCATION | MANAGEMENT | MEDICAL | ENGINEERING & IT | LAW | SOCIAL SCIENCES | PHYSICAL EDUCATION | JOURNALISM | PHARMACY

Editor
Mrs.Lata S. Sarkate

Executive Editor
Dr. Sadashiv H. Sarkate

Email : powerofknowledge3@gmail.com, shsarkate@gmail.com

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|---|
| १ | ज्ञानेश्वरीतील अभिरूची संपन्नता | प्रा. डॉ. चित्रा म्हाळस | १ |
| २ | रा.ना. चव्हाण यांना अभिप्रेत असलेले महात्मा जोतिबा फुले | प्राचार्य डॉ. सौ. शोभा इंगवले | ५ |
| ३ | मुस्लीम साहित्यातील समन्वयाची भूमिका | प्रा.डॉ.भारत हंडीबाग | ८ |
| ४ | मराठी दलित कथेचा उद्गमः जनता आणि प्रबुद्ध भारत | डॉ.युवराज धबडगे | ११ |
| ५ | आनंद यादव यांचे ललित गद्य लेखन | प्रा.डॉ.शांताराम शेलार | १३ |
| ६ | मुस्लिम मराठी कवितेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर | प्रा. मिलिंद वाव्हळे | १८ |
| ७ | उत्तम बंडू तुपे यांच्या दलित व ग्रामीण कादंबरीची तुलना | प्रा.डॉ.सौ.वंदना वि.नढे | २३ |
| ८ | कार्लमार्क्स आणि मराठी वाङ्मय | प्रा.डॉ.सदाशिव हरिभाऊ सरकटे | २५ |
| ९ | आदिवासी मराठी साहित्य : एक अभ्यास | प्रा.सौ.प्रेरणा एल.चव्हाण | २९ |
| १० | आजचे मराठी साहित्य आणि समाजपरिवर्तन (१९६० ते आजपर्यंत) | प्रा. ज्ञानेश्वर कांबळे | ३२ |
| ११ | चंद्रकुमार नलगे यांचे ललित गद्य लेखन : एक आस्वाद | प्रा.डॉ.शांताराम शेलार | ३७ |
| १२ | रविचंद्र हडसनकर यांच्या साहित्यातील | प्रभाकर शेळके | ४२ |
| १३ | जावेद पाशा यांची काव्यात्म सघर्षशीलता | प्रा.रमेश रिंगणे | ४७ |
| १४ | बहिणाबाईच्या कवितेतून दिसणारे कृषीजीवन | मयूरा सखाराम जाधव | ५० |
| १५ | लोकदैवत विठ्ठलाचे स्त्रीलोकगीतातील चित्रण | प्रा. डांगे दत्तात्रय महादेव | ५२ |
| १६ | सहित्य समीक्षाः स्वरुप व व्याप्ती | डॉ. राजशेखर नळगे | ५६ |
| १७ | यशवंतराव चव्हाणांची महाराष्ट्र -कर्नाटक सीमाप्रश्नविषयी भूमिका एक अवलोक | डॉ.चंद्रकांत बन्सीधर भांग | ६० |
| १८ | फाळणीचा उध्वस्त रस्ता - मुहाजीर | प्रा. पडघन अरुण | ६४ |

# अनुक्रमणिका



| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|---|
| १ | ज्ञानेश्वरीतील अभिरूची संपन्नता | प्रा. डॉ. चित्रा म्हाळस | १ |
| २ | रा.ना. चव्हाण यांना अभिप्रेत असलेले महात्मा जोतिबा फुले | प्राचार्य डॉ. सौ. शोभा इंगवले | ५ |
| ३ | मुस्लीम साहित्यातील समन्वयाची भूमिका | प्रा.डॉ.भारत हंडीबाग | ८ |
| ४ | मराठी दलित कथेचा उद्‌गमः जनता आणि प्रबुद्ध भारत | डॉ.युवराज धबडगे | ११ |
| ५ | आनंद यादव यांचे ललित गद्य लेखान | प्रा.डॉ.शांताराम शेलार | १३ |
| ६ | मुस्लिम मराठी कवितेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर | प्रा. मिलिंद वाव्हळे | १८ |
| ७ | उत्तम बंडू तुपे यांच्या दलित व ग्रामीण कादंबरीची तुलना | प्रा.डॉ.सौ.वंदना वि.नढे | २३ |
| ८ | कार्लमार्क्स आणि मराठी वाङ्मय | प्रा.डॉ.सदाशिव हरिभाऊ सरकटे | २५ |
| ९ | आदिवासी मराठी साहित्य : एक अभ्यास | प्रा.सौ.प्रेरणा एल.चव्हाण | २९ |
| १० | आजचे मराठी साहित्य आणि समाजपरिवर्तन (१९६० ते आजपर्यंत) | प्रा. ज्ञानेश्वर कांबळे | ३२ |
| ११ | चंद्रकुमार नलगे यांचे ललित गद्य लेखान : एक आस्वाद | प्रा.डॉ.शांताराम शेलार | ३७ |
| १२ | रविचंद्र हडसनकर यांच्या साहित्यातील | प्रभाकर शेळके | ४२ |
| १३ | जावेद पाशा यांची काव्यात्म सघर्षशीलता | प्रा.रमेश रिंगणे | ४७ |
| १४ | बहिणाबाईच्या कवितेतून दिसणारे कृषीजीवन | मयूरा सखाराम जाधव | ५० |
| १५ | लोकदैवत विठ्ठलाचे स्त्रीलोकगीतातील चित्रण | प्रा. डांगे दत्तात्रय महादेव | ५२ |
| १६ | सहित्य समीक्षाः स्वरुप व व्याप्ती | डॉ. राजशेखर नळगे | ५६ |
| १७ | यशवंतराव चव्हाणांची महाराष्ट्र -कर्नाटक सीमाप्रश्नविषयी भूमिका एक अवलोक | डॉ.चंद्रकांत बन्सीधर भांग | ६० |
| १८ | फाळणीचा उध्वस्त रस्ता - मुहाजीर | प्रा. पडघन अरुण | ६४ |

Power of Knowledge RNI No. MAHAUL 03008/13/ 1/2012-TC I.M.O.R.R. Journal

# "उत्तम बंडू तुपे यांच्या दलित व ग्रामीण कादंबरीची तुलना"

प्रा.डॉ.सौ.वंदना वि.नढे
मराठी विभाग
श्री. शिवछत्रपती महाविद्यालय, जुन्नर

१९६० नंतर नवे अनुभवविश्व घेऊन आलेल्या बाबूराव बागुल यांच्या साहित्याने दलित साहित्यात बदल झाला.त्यांनी एक विद्रोही नायक दलित साहित्यात आणला. त्यामुळे दलित चळवळीला अपेक्षित असलेले पाऊल बागुल यांच्या साहित्याने उचलले होते.

१९८० नंतर बागुलांच्या प्रेरणेतून उत्तम बंडू तुपे हे आघाडीचे व दर्जेदार कादंबरीकार लेखन करू लागले. त्यांनी कादंबरीतून दलित जीवनाचे वेगवेगळे पदर अलगदपणे उलगडून दाखविले. त्यांनी न्यायासाठी,हक्कासाठी,समतेच्या प्रस्थापनेसाठी कादंबरी लेखन केले. त्यांची दलित कादंबरी - 'झुलवा' (१९८६) व ग्रामीण कादंबरी - 'लांबलेल्या सावल्या' (१९९२) ह्या दोन कादंबऱ्यांचा तुलनात्मक आढावा घेणार आहे.

**कथानक :-** **'झुलवा'** ही दलित कादंबरी, मातंग समाजातील 'जगन' नावाच्या जोगतिणीवर आधारलेली,आठवीपर्यंत शाळा शिकलेली उपवर मुलगी . प्रथा टिकावी म्हणून कुटुंब व समाजाकडून जगनच्या शिक्षण घेण्याच्या आवडीला बाधा येते. ती त्यासाठी स्वत: मोलमजुरी करू इच्छिते पण समाजव्यवस्था तिला तसे करू देत नाही. त्यात गुरुजींच्या बाईल वृत्तीला ती (जगन) नकार देते त्यामुळे गुरुजी तिला शाळेतून काढून टाकतात.

जोगतीण व त्यात उपवर असलेली जगन तरुणांप्रमाणे (जयंता, कृष्णा) वृद्धांच्या (पाब्या) वासनेची शिकार होते. उदारनिर्वाहाची सोय नाही व पावलोपावली समाजात वावरताना सतत जोगतीण असल्याची तिला जाणीव करून दिली जाते. या सर्वाला कंटाळून नाईलाजास्तव ती जोगतीण होते. तिला त्यांच्या जातीकडून विवाहास विरोध्द होतो. तिचा झुलवा न लागल्यामुळे तिला गर्भपात करून घ्यावा लागतो. ह्या सर्व यातनामय जीवनाला कंटाळलेली, श्रद्धा- अंधश्रद्धा यांच्या जाळ्यात फसलेली जगन प्रथेविरुद्ध बंड करून उठते व देवीचा जग- मुखवटा नदीच्या पाण्यात भिरकावून देते.

**'लांबलेल्या सावल्या'** ही ग्रामीण कादंबरी, यात गरीब परिस्थितीत धडपडणाऱ्या व कष्ट करणाऱ्या शेतकरी कुटुंबातील 'माधव'चे चित्रण येते. सहावीत शिकत असलेल्या माधवला शिक्षण घेण्याची आवड म्हणून त्यासाठी तो फुले, बोरे विकून पैसा साठवितो परंतु मास्तरांचा मार व घरच्या परिस्थितीमुळे नाईलाजास्तव शिक्षण सोडावे लागते. गोतावळा, नातेवाईक खूप आहेत पण गरिबीमुळे कोणी मदत करीत नाहीत.

शाळा सोडल्यानंतर अंग मेहनत घेऊन व नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून वाटयाला आलेल्या पडीच्या शेताचे रुप तो व त्याचे कुटुंब बदलवून टाकतो तेव्हा दूर गेलेल्या वा लांबलेल्या सावल्या स्वार्थातून आपोआपच जवळ येतात.माधव पैशाच्या जोरावर स्वत:चे वेगळे अस्तित्व तो निर्माण करतो त्यामुळे त्याच्या कुटुंबाशी संबंध जोडायला लांबलांबून नातेवाईक येतात.तसेच त्याचे स्वत:चे सखेपण म्हणजे बहिणी, भाऊजी, मामा, काका, पुतणे हे सर्वजण माधवला फसवताना दिसतात. परंतु तो कोणाला बळी पडत नाही. स्वत:च्या हिमतीवर तो निवडणुकीतही यशस्वी होतो. स्वत:च्या हुशारीने, हिंमतीने व कष्टाने तो स्वत:चे वेगळेपण सिद्ध करतो.

**पात्रे :-** 'झुलवा' कादंबरीत जगन बरोबर येलू, पाब्या, परसू , रेणूका, दास्या , जयंता, कृष्णा ही पात्रे येतात. तर

'लांबलेल्या सावल्या'मध्ये माधव बरोबर वडील संपत, आई जानकी, चुलते भाऊ, नाना, चुलतभाऊ सुभाष, संपतच मामा, माधवच्या बहिणी गीता, कांता व त्यांचे नवरे व चंपा इ. पात्र येतात.

**भाषाशैली :-** तुपे यांच्या कादंबरीतील वाक्यरचना, व्यक्तिरेखांचे संवाद, वाक्प्रचार, म्हणी, प्रतिमासृष्टी, भाषा यावर परिसराचा परिणम दिसतो. त्यातून एका समाजाचे व संस्कृतीचे दर्शन घडते.

उदा. 'किडयाच्या पुंजक्यात काटकी घालावर नि पुंजका हलावा, तशा जोगतिणी हलल्या', 'जगन कोंबडं सोलता सोलता आपल्यालाच सोलत बसली हुती', इ. प्रतिमा व वाक्यरचना, तर 'ज्याचे हाती ससा तो पारधी', 'तोंड बघून विडा नि गांड बघून पिडा', 'लावला तर झुलवा न्हायतर कुणी बी हलवा', 'देव लागला दियाला, पदर न्हाय घियाला' इ. म्हणी, 'मला दावा अन् तुमी बी खावा', 'देवाची दासी सदा उपाशी' इ. लयबद्ध ठसकेबाज प्रकटन बुळं, कडुसं, पतनं, कारण, हेमलं, गळाठा इ. शब्द 'झुलवा' या कादंबरीत येतात.

'लांबलेल्या सावल्या'यात 'तीन ठिगळं लावून ही डुकराची पिल्लं बगलंत मारून आली', 'जत्रंचा देव देवळात हाय, माझ्या घरात न्हाय', 'डब्याची झाकणं दाबून बसवल्यागत डोळवनावर पापण्याचा ज्याम दडपा घाटल्यागत जडशील', 'तळव्यानं डोळवानं खसखसा हुरडयाची ऊन कणसं चोळल्यागत चोळली'. अशी ग्रामीण वाक्यरचना येते.

**वातावरणनिर्मिती :-** 'लांबलेल्या सावल्या'या कादंबरीत कोंबड्याचे बांगणे, प्राणी, पाळीव पशु-पक्षी यांचे वर्णन करून जणू शेतकरी गरीब घरांचे वर्णन करतात. दोन्ही कादंबरीत लेखक निर्सग, परिसर यांचे वर्णन करतात. सभोवतालच्या समाजजीवनातील व्यक्तिरेखा त्यांनी कादंबरीत साकारल्या आहेत. स्वतः त्या दलित समाजात जन्मलेले असल्याने दलितत्वाने मिळालेले दुःख, दारिद्र्य, अमानुषता, जातीयता इ.त्यांच्या कादंबरी लेखनात अवतारले आहे.

**वाङ्मयीन मूल्यमापन :-**

१) दोन्ही कादंबरीत तरुण पिढी कादंबरीचा मुख्य घटक बनलेली दिसते.

२) परिस्थितीला विरोध करणारी व नवी वाट निर्माण करणारी पिढी आहे.

३) वृद्ध किंवा जुनी पिढी धार्मिक रुढी परंपरा, श्रद्धा-अंधश्रद्धा, देवभोळेपणात गुंतलेली दिसते.

४) तरुण पिढी बंडखोर, प्रश्न विचारणारी अशी आहे. उदा. खंडोबाच दोघींचा एकच नवरा कसा?

५) आगतिक, लाचार म्हणून जातीतून विवाहास विरोध होतो. तर परिस्थिती बदलल्यावर लगेच विवाह करून घेण्यास उतावीळ झालेले नातेवाईक यात दिसतात.

६) उपेक्षित वर्गाला नजरेसमोर ठेवून तुपे आपली कादंबरी निर्मिती करतात.

७) वेदना, नकार, विद्रोह ते मांडतात. समूहमनाचे वास्तव समाजजीवन ते रेखाटतात. उदा. 'आपला जलम ह्यो असाच जायचा' येलूचे हे विचार समूहाचे प्रतिपादन करतात.

८) जातीकडून, कुटुंबाकडून आधार नाही उलट मतलबी, स्वार्थी समाज व नातेवाईक दिसतात.

९) दोन्ही कादंबऱ्यांमध्ये मनोरंजनाचा व विरंगुळ्याचा भाग वगळून वास्तवाचे भान ठेवलेले दिसते.

१०) तुपे दलित व ग्रामीण कादंबरीत प्रथा, परंपरांचा अतिरेक, अवडंबर किंवा वर्चस्व गाजवणाऱ्या आहेत.

११) निवेदनासाठी प्रमाण भाषा व संवादासाठी ग्रामीण बोली भाषेचा वापर केला आहे.

अशा तऱ्हेने विषय, आशय, अभिव्यक्तीच्या दृष्टीने तुपे यांच्या दोन्ही कादंबऱ्या अभिनव ठरतात.

❑ ❑ ❑